**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –2, March.2013**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

**इनामदार सज्जीद अब्दुल अजिज , रंगरेज आयेशा एम.एस.**

एम्.ए.,एम्.एड्., सेट. (शिक्षणशास्त्र)

एम्.ए.,एम्.एड्.,एम्.फिल.,पीएच.डी. .

**प्रस्तावना**

भारतीय समाज हा असंख्य जाती जमातीचा देश आहे. अनेक धर्माचे व वंशाचे लोक या भूखंडात शेकडो वर्षापासून नांदत आले आहेत. ते नेहमीच गुण्यागोविंदाने राहत आले आहेत. भारतामध्ये हिंदू बहुसंख्य असले तरी इतर धर्मियांची संख्या ही काही अगदीच उपेक्षणीय नाही. मुस्लिम,ख्रिस्ती,यहुदी, पारशी वगैरे धर्माचे अनुयायी कमी अधिक प्रमाणात येथे आहेत. त्याखेरीज हिंदू धर्माशी जवळचे नाते असलेले शीख, जैन, बौध्द वगैरे संप्रदाय (पंथ) ही येथे आहेत. भारत हा देश लोकशाहीप्रधान देश आहे. केंद्रातील संयुक्त लोकशाही आघाडीच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी भारतातील मुस्लिम अल्पसंख्याकांच्या सर्वंकष हितासाठी व त्याचबरोबर येथील मुस्लिम अल्पसंख्याकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दर्जा कशाप्रकारचा आहे, मुस्लिम अल्पसंख्याकांच्या समाजाच्या इतर समाजाच्या दृष्टीकोनातून किती व कोणत्या प्रमाणात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक इत्यादी विकास व प्रगती झाली आहे. याबाबत वेगवेगळया दृष्टीकोनातून आढावा घेण्यासाठी निवृत्त न्यायमुर्ती डॉ.राजेंद्र सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. या समितीने आपल्या दोन वर्षांच्या कालावधीत विविध राज्यातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व्यवसायिक इत्यादी मुस्लिम अल्पसंख्याकांच्या समाजाची परिस्थितीची अवलोकन करुन एक अहवाल तयार केला. इतर जातीप्रमाणे मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या शिक्षणाच्या वेगवेगळया स्तरावर समस्या असतात. वेगवेगळया शिफारशी मांडल्या जातात. डॉ.सच्चर आयोगाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली व ती म्हणजे मुस्लिम अल्पसंख्याकांचा समाज हा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात खूपच पिछाडीवर आहे व त्यांना इतर समाजाच्या प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांना खास अशी वेगळी तरतूद करण्याची गरज आहे व त्या दृष्टीकोनातून त्यानी पाऊले उचलली. पुढे डॉ.मनमोहनसिंग यांनी अल्पसंख्याकांच्या समाजासाठी १५ कलमी योजना आखली.

उच्च माध्यमिक शिक्षण हे माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यांना जोडणारा महत्वाचा दुवा आहे. उच्च माध्यमिक शिक्षण हा शिक्षणाचा गाभा आहे. म्हणून उच्च माध्यमिक स्तर हा अधिक महत्त्वाचा मानला जातो. या स्तरावरील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य घडत असते. म्हणून संशोधकांनी सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादी समस्या जाणुन घेण्यासाठी सदरहु संशोधनाची निवड केली आहे.

डॉ.सच्चर आयोगाच्या अहवालातून संशोधकाला मुस्लिम समाजातील विदयार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक दर्जा याबाबत कार्य करण्यात एक दिशा मिळाली. सोलापूर जिल्ह्यातील अशा मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील उच्च माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या विविध समस्या जाणून घेण्याकरीता म्हणजेच वस्तुस्थितीचा सखोल अभ्यास करण्याच्या पार्श्वभूमीवर संशोधकाने प्रस्तुत संशोधनाची निवड केली आहे.

**संशोधन अभ्यासाची गरज :-**

मानवाला कोणतेही कार्य करावयाचे असेल मग ते वैयक्तिक की समाजातील त्या कार्यात शिक्षणाची सांगड असेल तर ते उत्तम होवू शकते. शिक्षणासंबंधी अल्पसंख्यांक लोकांत निर्माण झालेला गैरसमज दूर करणेसाठी समाजपरिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून शिक्षणावर भर देण्यात आला व

**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –2, March.2013**
**ISSN:-2230-7850** Available online at www.isrj.net

राज्यघटने प्रमाणे वयाच्या १४ व्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण दयावयाचे अभिवचन देण्यात आले. असे जरी असले तरी मागील ४० वर्षात मागासवर्गीय , आदिवासी, अल्पसंख्यांक व स्त्रियांची ज्या गतीने प्रगती होणे आवश्यक होते. तशी ती होऊ शकली नाही. त्यामुळे समाजाचा पाहिजे तसा शैक्षणिक विकास झालेला नाही.

१.धर्म, जात, भाषा यापलीकडे जाऊन मुस्लिम अल्पसंख्यांकाच्या शैक्षणिक विकासाचा विचार व्हावा.

२.मुस्लिम अल्पसंख्यांकात रुढ झालेले गैरसमज दूर करणे.

३.मुस्लिम व आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी स्वतःचे कर्तव्य काय आहे ? याची जाणीव होण्यासाठी.

४.शिक्षणामुळे क्रांती घडू शकते हे पटवून देण्यासाठी .

५.सर्वधर्मसमभावनेची रुजवणूक करण्यासाठी.

६.शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या अल्पसंख्यांकाना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी.

७.अल्पसंख्यांकामधील अंधविश्वास व गैरसमज दूर करण्यासाठी .

भारतातील अल्पसंख्यांक मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रचार प्रसार न झाल्यामुळे शिक्षणाची आवश्यक ते लाभ मुस्लिम समाजाला मिळू शकलेले नाही. शिक्षणाविषयक शासकीय योजना त्यांच्या पर्यंत पोहचल्या नाहीत किंवा पोहचल्या तरी फारसा लाभ अल्पसंख्यांकाना घेता आला नाही याची जाणीव होते.त्यामुळे समाजात रोजगार,लोकसंख्या वाढ,द्रारिद्रय यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. म्हणूनच आज बहुसंख्य अल्पसंख्यांक समाज आज हलाखीचे जगणे जगत आहे. राष्ट्र किती ही प्रगत असला तरी देशातील सर्व नागरिकांना मिळालेल्या शैक्षणिक सुख सोयी यामुळे समाजाने केलेली प्रगती शिक्षणामुळे वाढलेले दरडोई उत्पन्नाचा देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा असतो. या दृष्टीने विचार करता देशातील अल्पसंख्यांक समाजाचे शैक्षणिक क्षेत्रात वाताहात झाल्याचे जाणीवपूर्वक नमूद करावेसे वाटते.देशाच्या प्रगतीत मुस्लिमांचाही सहभाग असणे काळाची गरज आहे. या दृष्टीने फक्त घोषणा न देता या संदर्भी आर्थिक तरतूद करुन प्रामाणिकपणे त्वरीत सुरुवात करणे गरजेचे आहे.

संशोधक हा गेली पाच वर्षे सोलापूर मधील सोलापूर ' नई जिंदगी ' या भागात राहत आहे. ' नई जिंदगी ' हा भाग मुस्लिम बहुल समुदाय असणारा भाग आहे व या भागातील समुदायातील विदयार्थ्यांचा संशोधकाशी नेहमी संपर्क येत असे. या गाठीभेटी दरम्यान बऱ्याच बहुतांशी विदयार्थ्यांची आर्थिक परिस्थिती भयंकर हालाखाची दिसून आली आणि निम्म्याहून पालक हे निरक्षर होते. त्यामुळे शिक्षणाबद्दल त्यांच्या मनात अभिरुची नव्हती . 'इज्जत की रोटी ' हे त्यांना महत्त्वपूर्ण वाटत असे. हे विदयार्थी दहावी नंतर नेमके कोणत्या शाखेकडे जावे याबाबतीत गोंधळलेल्या अवस्थेत दिसत. शिक्षकांनीही याबाबतीत मार्गदर्शन केले नाही असा सूर बऱ्याच विदयार्थ्यांना आवळला. खरे पाहता दहावी नंतरच्या टप्पा हा त्या विदयार्थ्यांच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण टप्पा ठरत असतो. त्यामुळे या टप्प्यावर विदयार्थ्यांना तसे पाहता मार्गदर्शनाची गरज असते व या स्थितीत जर त्या विदयार्थ्यांला सुयोग्य मार्गदर्शन केले नाही. तर त्या विदयार्थ्यांचे करीअर चांगल्या प्रकारे घडत नाही. या मुस्लिम विदयार्थ्यांच्या याबबातीत अजुन शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, इत्यादी बाबतीत कोणकोणत्या समस्या आहेत हे जाणून घेण्याची गरज संशोधकाला वाटली म्हणून सदर संशोधन समस्येची निवड संशोधकाने केलेली आहे.

संशोधक हा स्वतः मुस्लिम समाजाचे प्रतिनिधित्व करीत आहे. मुस्लिम समुदायातील विविध स्तरावरील विद्यार्थ्यांचा सतत संपर्क असतो. सच्चर आयोग व केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांकांच्या संदर्भात असणा-या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होणेकरीता तसेच मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, कौटूंबिक पार्श्वभूमीच्या अनुषंगाने असणाऱ्या विविध शैक्षणिक दर्जाचे स्वरुप जाणून घेण्यासाठी सदरहु संशोधन समस्येची निवड केली आहे. त्याचबरोबर सद्यस्थितीत मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या असणाऱ्या विविध समस्यांची सखोल माहिती

मिळविण्यासाठी सदरहु संशोधन समस्येची निवड केली आहे. तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक स्थिती व दर्जा सुधारण्यासाठी देखील सदरहु संशोधन समस्येची निवड केली आहे.

**संशोधन अभ्यासाचे महत्त्व :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या विविध समस्या जाणून घेवून त्यावर योग्य अशी उपाय योजना सुचविण्यात येणार आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधन हे महत्वपूर्ण आहे.

विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुस्लिम समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे सेवाभावी संस्था तसेच शासकीय धोरण राबविण्यामध्ये प्रस्तूत संशोधन यंत्रणेला संशोधकांच्या प्रस्तूत संशोधनातून वस्तुस्थितीदर्शक दिशा माहित करुन घेण्यासाठी मदत होणार आहे. विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता प्रस्तूत संशोधन निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. सदरहु संशोधानाचा उपयोग संबधित विषयावर संशोधन करणाऱ्या संशोधकाला मार्गदर्शन म्हणून उपयोगी पडणार आहे. तसेच संशोधकाची उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्यासाठी या संशोधनाचा उपयोग होणार आहे. संशोधकामध्ये संशोधनवृत्ती विकसीत होण्याच्या संदर्भात सदरहु संशोधनाचा उपयोग होणार आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया समस्यांची माहिती होण्यासाठी सदरहु संशोधनाचे मार्गदर्शन होणार आहे.

संशोधकाने निवडलेल्या समस्येचा उपयोग मुस्लिम समाजातील कुटूंबाचा दर्जा,उच्च माध्यमिक स्तरावरील मुला-मुलीचे शिक्षणातील प्रमाण,सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम मुला-मुलीच्या शिक्षणाची सदय:स्थिती जाणून घेण्यासाठी सदर संशोधनाचा उपयोग होणार आहे.

प्राचार्य,संस्थाचालक यांना भविष्यकाळात विदयालयाच्या कार्यपध्दतीची आखणी करताना, नवनवीन शाखांची सुरुवात करताना सदरचे संशोधन मार्गदर्शक ठरणार आहे.

विदयार्थ्यांच्या उच्च माध्यमिक विदयालयीन प्रगतीसाठी शिक्षकाचे मार्गदर्शन आवश्यक ठरते.विदयार्थ्यांचा परिसर .आर्थिक स्थिती, त्यांच्या घरगुती समस्यांचा त्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो. विदयार्थ्यांच्या समस्या जाणून घेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची दृष्टी निर्माण करण्यासाठी शिक्षकांना या संशोधनाचा उपयोग होणार आहे.

**संशोधन समस्येचे शीर्षक :-**

**"सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील विदयार्थ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास."**

**कार्यात्मक व्याख्या :-**

**१.सोलापूर जिल्हा** : महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यापैकी एक जिल्हा.

**२.उच्च माध्यमिक स्तर** : सोलापूर जिल्ह्यातील ज्या स्तरावर ऊर्दु माध्यमाच्या सर्व शाखातील चालणारे इयत्ता ११ वी व १२ वी चे वर्ग.

**३.अल्पसंख्यांक** :- ज्या भागात, ज्या धर्माचे, संप्रदायाचे, भाषेचे व जातीचे लोक बहुसंख्यांकांच्या तुलनेत ५० टक्कयापेक्षा कमी प्रमाणात आहेत.

**४.चिकित्सक अभ्यास** :- मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटूंबिक, सामाजिक व शैक्षणिक आर्थिक समस्यांचा सूक्ष्म, सखोल, व सर्वंकष अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१.सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांची सदय:स्थिती अभ्यासणे.

२.सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांची सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

३.सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांच्या कौटूंबिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

४.सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.

५.सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांच्या विविध समस्यांवर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये सोलापूर जिल्ह्यातील फक्त उर्दू माध्यमाच्यांच उच्च माध्यमिक विदयालयाचा विचार केलेला आहे. उर्दू उच्च माध्यमिक विदयालयातील मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांचा फक्त सामाजिक, आर्थिक, कौटूंबिक, शैक्षणिक समस्यांचा विचार केलेला आहे. उर्दू माध्यमाचा उच्च माध्यमिक स्तरावरील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विदयार्थ्याचा समावेश केला आहे.

**संशोधनाची मर्यादा :-**

१.सदरहू संशोधनामध्ये इतर जिल्ह्याचा विचार न करता फक्त सोलापूर जिल्ह्याचा विचार केला आहे.

२.सदरहू संशोधनामध्ये उर्दू माध्यमशिवाय इतर माध्यमांच्या विदयार्थ्यांच्या विचार केलेला नाही.

३.सदरहू संशोधनामध्ये उच्च माध्यमिक स्तरावरील विदयार्थ्यांच्या फक्त सामाजिक,आर्थिक, कौटूंबिक,शैक्षणिक समस्या व्यतिरिक्त इतर समस्यांचा विचार केलेला नाही.

**संशोधनाची गृहितके :**

१.ऊर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांची गळती उच्च माध्यमिक स्तरावरील इतर माध्यमांच्या विद्यार्थ्यापेक्षा जास्त असते.

२.मुस्लिम विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन समाधानकारक नसतो.

३.मुस्लिम विद्यार्थ्यांना आर्थिक, सामाजिक व कौटूंबिक समस्यांना मोठया प्रमाणात सामोरे जावे लागते.

४.मुस्लिम विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व विकास समाधानकारक वाटत नाही.

**संशोधनासाठी संशोधन पध्दतीची निवड :**

संशोधनाची पद्धती कोणती असावी हे समस्येचे स्वरूप, परिस्थिती यावर अवलंबून असते. सदर संशोधनासाठी संशोधकांने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या पद्धतीमध्ये विद्यालय सर्वेक्षण (शालेय सर्वेक्षण) व लोकमत सर्वेक्षण या प्रकारच्या पद्धतीचा वापर केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उर्दू उच्च माध्यमिक विदयालयातील विदयार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी विदयालयाचे प्राचार्य शिक्षक, पालक,विदयार्थी, समाजातील शिक्षण क्षेत्रात काम करणारी मंडळी यांच्याशी चर्चा करुन नेमक्या समस्या जाणून घेणे गरजेचे होते.

शिक्षणाविषयी पालकांचा, समाजाचा असलेला दृष्टीकोन जाणून घेणे सर्वेक्षण पध्दतीमुळेच शक्य झाले.

सोलापूर जिल्ह्यातील उच्च माध्यमिक स्तरावरील उर्दू उच्च माध्यमिक विदयालयाली सदय:स्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीच उपयुक्त होती.

एकूणच या संशोधनासाठी लागणारी सर्व माहिती सर्वेक्षण व त्यातील सर्वेक्षणाचे विविध प्रकार वापरून जमा करण्यात आली.

**नमुना निवड :**

शैक्षणिक संशोधनामध्ये समस्येचा चिकित्सक अभ्यास करताना अध्ययन विषयाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक घटकाचा समावेश करून अभ्यास करणे केव्हाही आदर्शच असते. पण जेव्हा अभ्यास विषय व्यापक, विस्तृत असेल तेव्हा आपण सर्वच्या सर्व घटकांचा अभ्यास करण्यावर मर्यादा येतात. अशा वेळी सर्व घटकांमधील काही घटकांचा अभ्यास करून निष्कर्ष काढले जातात.

**संशोधनासाठी नमुना निवड :**

वरील सर्व नमुना निवडीच्या प्रकारापैकी संशोधकाने सुगम यादृच्छिक नमुना निवड हा प्रकार निवडलेला आहे.

**१.विदयालयाची निवड :**

सोलापूर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व (८) उर्दू उच्च माध्यमिक विदयालयाची निवड करण्यात आली आहे. (१०० टक्के) यासाठी ग्रामीण व शहरी विभागासाठी शेकडा प्रमाण ८० व २० टक्के आहे. सदरचे प्रमाण हे शहरी व ग्रामीण भागातील विदयार्थीचा संख्येवर आहे.

| **शहरी विभाग नमुना** | **ग्रामीण विभाग नमुना** | **एकूण नमुना निवड** |
|---|---|---|
| **(८०टक्के )** | **(२०टक्के )** | **(१०० टक्के )** |

**२.शिक्षकांची निवड :-**

सोलापूर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व उर्दू उच्च माध्यमिक विदयालयातील सर्व ८०शिक्षकांची नमुना निवडीत समावेश केला गेलेला आहे.त्यामुळे १००टक्के नमुना निवड केलेली आहे.

**३.प्राचार्य निवड :-**

संशोधानासाठी निवडलेल्या सर्वच उच्च माध्यमिक विदयालयामधील सर्वच्या सर्व ८ प्रार्चायांची निवड म्हणजेच १०० टक्के नमुना निवड मुलाखतीसाठी करण्यात आली आहे.

**४.विदयार्थी निवड :-**

संशोधनासाठी सोलापूर जिल्ह्यातील उर्दू उच्च माध्यमिक विदयालयातील सर्वच्या सर्व (२५००) विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. म्हणजेच विदयार्थ्यांची निवड (१००टक्के ) नमुना निवडीत केलेली आहे. या सर्व विदयार्थ्यांना प्रश्नावली देवून माहिती गोळा करण्यात आली.

| सोलापूर जिल्हायातील उर्दू उच्च माध्यमिक विदयालयामधील विदयार्थ्यांची एकूण संख्या | निवडलेला नमुना एकूण विदयार्थी संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २५०० | २५०० | १००टक्के |

**पालक निवड :-**

संशोधनासाठी निवडलेल्या ८ उच्च माध्यमिक विदयालयामधील २५० पालकांची निवड म्हणजे १० टक्के पालकांची निवड नमुना निवडीच्या सहेतूक पध्दतीने करण्यात आली आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्राची निवड :-**

सदरहू संशोधनासाठी गोळा केलेल्या माहितीच्या पृथक्करणासाठी **शेकडेवारी** या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने व तंत्रे :**

संशोधनासाठी लागणारी माहिती संकलित करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, पडताळासूची, पदनिश्चयन श्रेणी, मानसशास्त्रीय कसोट्या अशा विविध साधनांचा वापर करण्यात येतो. या साधनाने मिळालेली माहिती संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपाची असते.

**संशोधन अभ्यासात साधनांची निवड :**

१. प्रश्नावली - विद्यार्थि

२. मुलाखत - शिक्षक, पालक , मुख्याध्यापक

३. निरीक्षण

४. पडताळा सूची

**माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन :**

सदर संशोधनाची उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून उर्दू उच्च माध्यमिक विदयालयातील मुस्लिम विद्यार्थ्यांना येणाऱ्या विविध समस्यांची चिकित्सक माहिती, विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य , पालक यांच्यामार्फत प्रश्नावली, मुलाखत व निरीक्षण या संशोधन साधनांद्वारे संकलित करण्यात आलेली आहे. या संकलित माहितीचे संकलन, विशदीकरण व विश्लेषण या प्रकरणात करण्यात आले आहे. ही माहिती मांडताना प्रथम प्रश्नावली व योग्य त्या ठिकाणी मुलाखत आणि निरीक्षण या साधनांद्वारे मिळालेल्या माहितीचाही संबंध नमूद करून क्रमवार कोष्टकात मांडून विश्लेषण करण्यात आले आहे.

**२. संशोधनाचे निष्कर्ष :**

या संशोधनासाठी प्रश्नावली,मुलाखत आणि निरीक्षण या साधनाव्दारे प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करुन संशोधनाच्या उद्दीष्टानुसार पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**विद्यार्थी प्रश्नावलीवरून मिळालेले निष्कर्ष :**

**उद्दिष्ट क्रं. १:- सामाजिक समस्या**

**१.** पालक मुलींच्या शिक्षणाला महत्त्व देतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २३ टक्के इतके आहे तर पालक मुलांच्या शिक्षणाला महत्त्व देत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७७टक्के इतके आहे.

**२.**पालका विरोध होणाऱ्या बाबतीत सहशिक्षणास विरोध होतो असे प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे. उच्च माध्यमिक विद्यालयात एकटे जाणे या गोष्टीस विरोध होतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. उच्च माध्यमिक विद्यालयातील स्पर्धामध्ये भाग घेण्यास विरोध होतो असे प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४०टक्के इतके आहे तर उर्दू माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमातून शिक्षण घेणेस विरोध होतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे.

**३.** वरील गोष्टींना विरोध होण्याच्या कारणाबाबत पालकांची मानसिकता अशीच आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे तर काही परंपरा मुळे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६०टक्के इतके आहे तर मूलींबद्दल असुरक्षिततेची भावना असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे.

**४.**उच्च माध्यमिक विद्यालयात जाताना मुलींना बुरखा घालण्याची सक्ती पालक करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ८५टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात जाताना मुलींना बुरखा घालण्याची सक्ती पालक करीत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १५टक्के इतके आहे.

**५.**ज्या भागात राहतात तेथील वातावरण शिक्षणासाठी पुरक आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर ज्या भागात राहतात तेथील वातावरण शिक्षणासाठी पुरक नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७० टक्के इतके आहे.

**६.**समाजातील व्यक्ती शिक्षणाबाबत प्रोत्साहन देतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १३टक्के आहे तर समाजातील व्यक्ती शिक्षणाबाबत प्रोत्साहन देत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ८७टक्के इतके आहे.

**७.**शिक्षण घेताना मध्ये धार्मिक शिक्षण ही अडचण येते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण२५ टक्के इतके आहे. शिक्षण घेताना लग्नाची घाई / लवकर लग्न करणेस प्रवृत्त करणे अशी अडचण येते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ४० टक्के इतके आहे तर शिक्षण घेताना उद्योगधंद्यात गुंतविणे अशी अडचण येते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे.

**८.**उच्च माध्यमिक विद्यालयात लैंगिक शिक्षण असणे आवश्यक आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७५टक्के तर उच्च माध्यमिक विद्यालयात लैंगिक शिक्षण आवश्यक वाटत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २५ टक्के इतके आहे.

**९.**वक्फ बोर्डातून शिक्षणास मदत घेतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे तर वक्फ बोर्डातून शिक्षणास मदत घेत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ९०टक्के इतके आहे.

**कौटुंबिक समस्या**

**१०.**पालक अशिक्षित आहेत असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण टक्के इतके आहे. पालकांचे शिक्षण इयत्ता १ ली ते ५ वी असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५० टक्के इतके आहे. पालकांचे शिक्षण इयत्ता ६ वी ते १० वी आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. पालकांचे शिक्षण इयत्ता ११ ते १२ वी आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. पालक पदवीधर आहेत असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण०५ टक्के इतके आहे पालक उच्च शिक्षित आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण०५ टक्के इतके आहे

**११.**कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २९ हजारापर्यत आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३० ते ४९ हजारपर्यंत आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६०टक्के इतके आहे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५० ते ८० हजारपर्यंत आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण२०टक्के इतके आहे. पालकाचे वार्षिक उत्पन्न ८१ ते एक लाख पर्यंत आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे तर कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखपेक्षा अधिक आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**१२.**कुटुंब पध्दती एकत्र प्रकारातील आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे तर कुटुंब पध्दती विभक्त प्रकारातील असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३५टक्के इतके आहे.

**१३.**घरामधील सुविधामध्ये संगणक सुविधा उपलब्ध आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. अभ्यास खोली आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. घरामध्ये टी. व्ही. आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७०टक्के इतके आहे तर घरामध्ये टेबल - खुर्ची आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**१४.**घरी अभ्यासासाठी योग्य वातावरण आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २७टक्के इतके आहे तर घरी अभ्यासासाठी योग्य वातावरण नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७३ टक्के इतके आहे.

**१५.**शिक्षणापासून घरातून प्रोत्साहन मिळते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २७ टक्के इतके आहे तर शिक्षणासाठी घरातून प्रोत्साहन मिळत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७३ टक्के इतके आहे

**१६.**उच्च माध्यमिक विद्यालयात नियमित उपस्थित राहतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४०टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात नियमित उपस्थित राहत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६०टक्के इतके आहे.

**१७.**उच्च माध्यमिक विद्यालयात नियमित उपस्थित नसल्याच्या कारणामध्ये घरी लहाण भावंडे सांभाळावी लागतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे .पालकांना शेती करण्यात मदत करावी लागते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. शिक्षणाबद्दल नावड आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात वेळेबाबत गैरसोय होते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४०टक्के इतके आहे.

**१८.**शैक्षणिक गरजांना पालक अधिक महत्त्व देतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३५टक्के इतके आहे तर मुलभूत गरजांना पालक अधिक महत्व देतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे.

**१९.**घरातील कौटुंबिक समस्यामुळे अभ्यासावर परिणाम होतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण६०टक्के इतके आहे तर घरातील कौटुंबिक समस्यामुळे अभ्यासावर परिणाम होत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४० टक्के इतके आहे.

**२०.**कुटुंबातील सभोवतालचे वातावरण शैक्षणिक दृष्ट्या अनुकूल आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३३ टक्के इतके आहे तर कुटुंबातील सभोवतालचे वातावरण शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६७ टक्के इतके आहे.

**२१.**कुटुंबात धार्मिक रितीरिवाज पाळतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७२टक्के इतके आहे तर कुटुंबात धार्मिक रितीरिवाज पाळत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २८टक्के इतके आहे.

**२२.**घरात उर्दू वर्तमानापत्र विकत घेतली जातात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर घरात उर्दू वर्तमानपत्र विकत घेतली जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७०टक्के इतके आहे.

**२३.**घरी अभ्यासासाठी व्यक्तिगत योग्य मार्गदर्शन मिळते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २७टक्के इतके आहे तर घरी अभ्यासाठी व्यक्तिगत योग्य मार्गदर्शन मिळत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७३टक्के इतके आहे.

**<u>आर्थिक समस्या</u>**

**२४.**कुटुंबाला आर्थिक स्त्रोत शेती आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण०५टक्के इतके आहे. नोकरी हा कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत आहे असा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. रोजंदारी हा कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत आहे अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६०टक्के इतके आहे. लघु व्यवसाय हा कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत आहे अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे तर घरभाडे हा कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत आहे अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०५ टक्के इतके आहे.

**२५.**शिक्षणात आई मदत करते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे. शिक्षणात वडील मदत करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४५टक्के इतके आहे. शिक्षणात नातेवाईक मदत करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०५ टक्के आहे तर शिक्षणाचा खर्च स्वतःच करतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे.

**२६.**उच्च माध्यमिक विद्यालयात कमवा आणि शिका योजना आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात कमवा आणि शिका योजना नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १००टक्के इतके आहे.

**२७.**शिक्षण घेताना आर्थिक अडचण जाणवते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७६टक्के इतके आहे तर शिक्षण घेताना आर्थिक अडचण जाणवत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २४ टक्के इतके आहे.

**२८.**खाजगी शिकवणीला जातो अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर खाजगी शिकवणीला जात नाही अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७०टक्के इतके आहे.

**२९.**शिकवणीची फी पालक स्वखुशीने देतात अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ७०टक्के इतके आहे तर शिकवणीची फी पालक स्वखुशीने देत नाही असा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३० टक्के आहे.

**३०.**अर्धवेळ नोकरी करतो अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण२६टक्के इतके आहे तर अर्धवेळ नोकरी करत नाही अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७४टक्के इतके आहे.

**३१.**घरापासून उच्च माध्यमिक विद्यालयात चालत जातो अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे. रिक्षा/ टमटम ने जातो अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. घरापासून उच्च माध्यमिक विद्यालयात एस. टी. बस ने जातो अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. घरापासून उच्च माध्यमिक विद्यालयात सायकलीवरुन जातो अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ५०टक्के इतके आहे तर दुचाकी वाहनावरुन जातो अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**शैक्षणिक समस्या**

**३२.**उच्च माध्यमिक विदयालयात शाखा निवडताना मार्गदर्शन मिळते यामध्ये स्वयंमार्गदर्शन मिळते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे. कुटुंबाकडून मार्गदर्शन मिळते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. शिक्षकाकडून मार्गदर्शन मिळते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५० टक्के इतके आहे तर नातेवाईकाकडून मार्गदर्शन मिळते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २० टक्के इतके आहे.

**३३.**सद्यस्थितीत निवडलेली शाखा आवडीने निवडलेली आहे असा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४०टक्के इतके आहे तर सद्यस्थितीत निवडलेली शाखा आवडीने निवडलेली नाही अशा प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६०टक्के इतके आहे.

**३४.**उच्च माध्यमिक विदयालयात प्रवेश घेताना अडचणी येतात यामध्ये आर्थिकचा तरतूदी अभाव असतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे. घरच्यांच्या पाठींबाचा अभाव असतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २५ टक्के इतके आहे. पालकांचे अज्ञान असते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २५ टक्के इतके आहे तर सहशिक्षणाला विरोध असतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १५ टक्के इतके आहे.

**३५**.पालक शिक्षणाबद्दल जागरुक आहेत असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ८२ टक्के इतके आहे तर पालक शिक्षणाबद्दल जागरुक नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १८ टक्के इतके आहे.

**३६.**उच्च माध्यमिक विद्यालयात ग्रंथालय आहे असा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ८२ टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालया ग्रंथालय नाही अशा प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १८ टक्के इतके आहे.

**३७.**ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ पुरेसे आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ४० टक्के इतके आहे तर ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ पुरेसे नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ६० टक्के इतके आहे.

**३८.**उच्च माध्यमिक विदयालयाच्या ग्रंथालयातून मराठी माध्यमाचे दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे. इंग्रजी माध्यमाचे दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १५टक्के इतके आहे तर उर्दू माध्यमाचे दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे.

**३९.**उच्च माध्यमिक विदयालयाच्या ग्रंथालयातून ईनक्लाब उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ९०टक्के इतके आहे. मुन्सिफ उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्के इतके आहे उर्दू टाईम्स उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. सदा - ए - महाराष्ट्र उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्के इतके आहे. उर्दू मेला उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ००टक्के इतके आहे. नशेमन उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्केइतके आहे तर कासीर उर्दू दैनिक वर्तमानपत्र उपलब्ध होतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्के इतके आहे

**४०.**उच्च माध्यमिक विद्यालयाच्या ग्रंथालयातून शैक्षणिक मासिके उपलब्ध होतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३७ टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या ग्रंथालयातून शैक्षणिक मासिके, उपलब्ध होत नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६३टक्के इतके आहे.

**४१.**उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रयोगशाळा आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०० टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान प्रयोगशाळा नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०० टक्के इतके आहे.

**४२.**विज्ञान विषयातील प्रयोग करताना अडचणी येतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे तर विज्ञान विषयातील प्रयोग करताना अडचणी येत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे.

**४३.**विज्ञान विषयातील प्रयोग करताना अडचणीमध्ये प्रयोग साहित्याचा अभाव असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे. प्रयोगशाळेत नियोजनाचा अभाव असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १५टक्के इतके आहे. प्रयोग लवकर आकलन होत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २५टक्के इतके आहे. शिक्षक स्वतः प्रयोगाचे दिग्दर्शन करीत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर शिक्षक प्रयोगाविषयी वैयक्तिक मार्गदर्शन करीत नाही. असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**४४.**उच्च माध्यमिक विद्यालयात विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १००टक्केटक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधने उपलब्ध नाहीत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०० टक्के इतके आहे.

**४५.** शैक्षणिक साधने उपलब्ध असल्यास दृक साधने उपलब्ध आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६२ टक्के इतके आहे. शैक्षणिक साधनात श्राव्य साधने उपलब्ध आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २८टक्के इतके आहे तर शैक्षणिक साधनात दृक-श्राव्य साधने उपलब्ध आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**४६.**शिक्षक अध्यापनात दृक साधनाचा वापर करण्यामध्ये नकाशांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. तक्ते यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण४५टक्के इतके आहे. आलेख यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण०५टक्के इतके आहे. प्रतिकृती यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण१० टक्के इतके आहे. चित्रे यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १८टक्के इतके आहे. फोटो यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ०२ टक्के इतके आहे. कात्रणे यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ०५टक्के इतके आहे तर नमुने यांचा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ०५ टक्के इतके आहे.

**४७.**शिक्षक श्राव्य साधनामध्ये आकाशवाणी याचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. शिक्षक अध्यापनात टेपरेकॉर्डस चा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३० टक्के इतके आहे. भाषा प्रयोगशाळा चा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ००टक्के इतके आहे तर शिक्षक अध्यापनात ऑडिओ सिडी प्लेअर चा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७०टक्के टक्के इतके आहे.

**४८.**शिक्षक अध्यापनात दृक-श्राव्य साधनांमध्ये संगणकाचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण०५टक्के इतके आहे. शिक्षक अध्यापनात दूरदर्शन या दृक-श्राव्य साधनांचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे. शिक्षक अध्यापनात व्हिडीओचा वापर करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ०५टक्के इतके आहे . शिक्षक अध्यापनात व्हिडीओ सिडी प्लेअर वापर

करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०५टक्के इतके आहे तर एल.सी.डी प्रक्षेपक चा वापर करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ००टक्के इतके आहे.

**४९.**उच्च माध्यमिक विद्यालयात वसतिगृहाची व्यवस्था आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात वसतिगृहाची व्यवस्था नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ९३टक्के इतके आहे.

५०.उच्च माध्यमिक विद्यालयातील वसतिगृहात राहतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ० टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयातील वसतिगृहात राहत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १००टक्के इतके आहे.

**५१.**उच्च माध्यमिक विद्यालयात क्रिडांगण आहे असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४५टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात क्रिडांगण नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५५ टक्के इतके आहे.

**५२.**उच्च माध्यमिक विदयालयात विविध क्रिडासाहित्य उपलब्ध आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६६टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विदयालयात विविध क्रिडासाहित्य उपलब्ध नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण३४ टक्के इतके आहे.

**५३.**उच्च माध्यमिक विद्यालयात संगणक सुविधा आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ९०टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात संगणक सुविधा नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे.

**५४.**स्वयंअध्ययन करण्यास शिक्षक प्रवृत्त करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २५टक्के इतके आहे तर स्वयंअध्ययन करण्यास शिक्षक प्रवृत्त करीत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ८५टक्के इतके आहे.

**५५.** शिक्षक विचारलेल्या शंकाचे योग्य निरसन करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६२टक्के इतके आहे तर शिक्षक विचारलेल्या शंकाचे योग्य निरसन करीत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३८टक्के टक्के इतके आहे.

**५६.** प्रपाठामध्ये चुका झाल्यास शिक्षक समजावून सांगतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५टक्के इतके आहे तर प्रपाठामध्ये चुका झाल्यास शिक्षक समजावून सांगत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे.

**५७.**अध्यापनासाठी नवनवीन तंत्रे पध्दती यांचा वापर शिक्षक करतात असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ६५ टक्के इतके आहे तर अध्यापनासाठी सध्या नवनवीन तंत्रे, पध्दती वापर शिक्षक करीत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे.

**५८.** उच्च माध्यमिक विद्यालयात विविध सहशालेय उपक्रमाचे आयोजन केले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४२ टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात विविध सहशालेय उपक्रमाचे आयोजन केले जात नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५८टक्के इतके आहे.

**५९.** उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित करत असलेले सहशालेय उपक्रमात विज्ञान प्रदर्शन घेतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १० इतके आहे. समाजसेवा आयोजित केल जाते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे. स्नेहसंमेलन आयोजित केले जाते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०टक्के इतके आहे. क्रिडास्पर्धा आयोजित केले जाते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे तर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ४० टक्के इतके आहे

**६०.**उच्च माध्यमिक विद्यालयात सहशालेय उपक्रमाचे आयोजन करीत नसल्यास उच्च माध्यमिक विद्यालयात विविध कार्यक्रमाविषयी प्रेरणा मिळत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण२० टक्के इतके आहे. उच्च माध्यमिक विद्यालयात विदयालयात मार्गदर्शन मिळत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे.विविध कार्यक्रमाचे साहित्य मिळत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे. सांस्कृतिक सभागृह नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १० टक्के इतके आहे. आत्मविश्वास वाटत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ०५टक्के इतके आहे तर घराकडून पालकांची संमती मिळत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे.

**६१.** उच्च माध्यमिक विदयालयात सहलीचे आयोजन केले जाते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ०० टक्के इतके आहे तर सहलीचे आयोजन केले जात नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १०० टक्के इतके आहे.

**६२.**अध्ययनास उपयुक्त असे दुरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम नेहमी पाहतो असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण १०टक्के इतके आहे. अध्ययनास उपयुक्त असे दूरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम कधी - कधी पाहतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २०टक्के इतके आहे तर अध्यापनास उपयुक्त असे दूरर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम कधीच पाहत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७० टक्के इतके आहे.

**६३.** उच्च माध्यमिक विद्यालयात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिस्त, चांगले वर्तन इ. विषयी योग्य मार्गदर्शन मिळते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ६५टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिस्त, चांगले वर्तन इ. विषयी योग्य मार्गदर्शन मिळत नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३५ टक्के इतके आहे.

**६४.**उच्च माध्यमिक विद्यालयात मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी शासकीय सवलतीत मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण६० टक्के इतके आहे. मौलाना आझाद शालेय शिष्यवृत्ती योजना आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा४०टक्के प्रमाण इतके आहे.

**६५.**शासनाने जाहीर केलेले अद्यावत सवलती , इतर योजना यांची माहिती योग्य वेळी दिली जाते असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण६७टक्के इतके आहे तर शासनाने जाहीर केलेले अद्यावत सवलती, इतर योजना यांची माहिती योग्य वेळी दिली जात नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ३३ टक्के इतके आहे.

**६६.**शिक्षण घेऊन सुध्दा नोकरीची खात्री आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ६२ टक्के इतके आहे तर शिक्षण घेऊन सुध्दा नोकरीची खात्री नाही असे वाटते असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३८ टक्के इतके आहे.

**६७.**उच्च माध्यमिक विद्यालयाकडून बस सेवा उपलब्ध आहे असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ००टक्के इतके आहे तर उच्च माध्यमिक विद्यालयाकडून बस- सेवा उपलब्ध नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण १००टक्के इतके आहे.

**शिक्षक मुलाखती वरून मिळालेले निष्कर्ष :**

**१.**७६ टक्के प्रतिसादकांनी अध्यापन करताना पारंपारिक अध्यापन पध्दतीचा वापर करतात असा प्रतिसाद दिला तर २४ टक्के प्रतिसादकांनी संगणक सहायित अध्यापन , बुध्दीमंथन इत्यादी पध्दतीचा वापर करतात असा प्रतिसाद दिला.

**२.**उच्च माध्यमिक विदयालयामधील विदयार्थ्यांच्या शिस्तीचा अभाव, अध्यापन करताना शैक्षणिक साधनाचा अभाव, रस्त्यावरील रहदारीचा आवाज , खडू ठिसूळ असल्यामुळे धूळ उडते, या अडचणी प्रामुख्याने येतात. असे म्हणणारे प्रतिसादकांचे प्रमाण ७८टक्के आहे तर पत्राच्या खोल्या असल्यामुळे गरम होते, वायु विजनाची सोय नाही, भारनियमन इ. अडचणी येतात असे म्हणणारे प्रतिसादकाचे प्रमाण २२टक्के इतके आहे.

**३.**अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी सोंडविण्यासाठी अध्यापन करताना ध्वनिक्षेपक चा वापर करणे, खडूचे बॉक्स स्वतः चांगले आणतो, विदयार्थ्यांची वारंवार कान उघाडणी करणे किंवा समज देणे , शैक्षणिक साहित्य स्वतः खरेदी करुन अध्यापन करणे असे म्हणणारे प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७८टक्के इतके होते तर जनरेटरची सोय करणे, असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २२टक्के इतके होते.

**४.** विदयालयाची प्रगती व प्राप्त गुणानुसार त्या-त्या क्षेत्रात प्रवेश देण्यास सहकार्य करतात असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ३०टक्के इतके आहे. तर विदयार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीसाठीचे प्रवेश मिळवून न देत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसांदकाचे शेकडा प्रमाण ७०टक्के इतके आहे.

**५.**विदयार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतो असे म्हणणारे प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण २५टक्के होते तर विदयार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेत नाही असे म्हणणारे प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ७५टक्के निम्म्याहून अधिक होते .

**६**.विविध प्रकारच्या होणाऱ्या चाचण्या, टयूटोरियल ,अंतर्गत परिक्षा या माध्यमातून प्रगतीचा आढावा घेतो अशा प्रतिसादकांचे प्रमाण ८०टक्के इतके होते तर याशिवाय वरील प्रकारा बरोबरच दर आठ दिवसाला विदयार्थ्याबरोबर झालेल्या अभ्यासक्रमाविषयी चर्चा घडवून आणतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण २०टक्के होते.

**७.**विदयार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन करतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण ४८टक्के होते तर विदयार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन करीत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण ५२टक्के होते.

**८.** व्यावसायिक मार्गदर्शन करत असताना, जेव्हा विदयार्थी ११ वी प्रवेश घेतो तेंव्हा , १२ वी त गेल्यानंतर, १२ वी नंतर वेगवेगळे कोर्सेस कोणकोणते आहेत, त्या कोर्सेची किमान व कमाल पात्रता (गुणाची , टक्केवारीची) काय असते असे सांगणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण २५टक्के होते तर कोणत्या व्यावसायिक कोर्सेसना बाजारात जास्त मागणी आहे, कोणत्या कोर्सेस मधून तुम्हांला जास्त वाव मिळेल विविध व्यावसायिक मार्गदर्शन करणाऱ्या विविध संस्था यांचे ओळख करुन देतो (पत्ते,फोन नं.)असे सांगणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण २२टक्के होते तर व्यावसायिक मार्गदर्शन करीत नाहीत असे म्हणणाऱ्या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण ५२टक्के होते.

**९.**सध्याच्या अभ्यासक्रमात आम्हाला अपेक्षित कोणतेच बदल नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसांदकाचे शेकडा प्रमाण १००टक्के इतके होते.

**१०**.७५टक्के प्रतिसादकांनी विषयाचे ज्ञान अदयावत ठेवण्यासाठी कोणतेच प्रयत्न करीत नाही. फक्त सेवा ज्येष्ठता नुसारच्या प्रशिक्षणास हजर राहतो. असा प्रतिसाद दिला तर २०टक्के प्रतिसादकांनी ज्ञान अदयावत ठेवण्यासाठी रोजचे वर्तमानपत्रे वाचणे , टी.व्ही. वरच्या शैक्षणिक बाबी संदर्भातील कार्यक्रम पाहणे, आपल्या विषयाच्या संदर्भातील परिसंवाद, कार्यशाळा, संमलने यांना उपस्थित राहणे. असा प्रतिसाद दिला.

**प्राचार्य मुलाखतीवरून मिळालेले निष्कर्ष :**

**१.**१००टक्के प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना मागील इयत्तेतील गुण, विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कशा स्वरुपाची आहे, विद्यार्थी स्थानिक आहे की परगावचा आहे इ. निकष लावतात असा प्रतिसाद दिला.

**२.**१००टक्के प्राचार्यांनी काही विद्यार्थीचे पालक अंतिम परिक्षेस येण्याची परवानगी मागतात, विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्यात सुट मिळावी असा प्रतिसाद दिला.

**३.**९०टक्के प्राचार्य प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधतात असा प्रतिसाद दिला तर १०टक्के प्राचार्य प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधत नाहीत असा प्रतिसाद दिला.

**४.**९०टक्के प्राचार्य विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद विद्यार्थ्यांचे गुणपत्रक देताना, ११ वी विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभावेळी, सहशालेय कार्यक्रमाच्या आयोजनावेळी, परिक्षेच्या कालावधीत, रमजान महिन्याच्या इफ्तार पार्टीत संवाद साधतात असा प्रतिसाद दिला तर १०टक्के प्राचार्य प्रत्यक्ष विद्यार्थ्यांशी संवाद साधत नाही असा प्रतिसाद दिला.

**५.**१००टक्के प्राचार्याच्या मते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी १२ वी च्या परिक्षेच्या वेळी व्याख्यान मालेचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढावी यासाठी आदर्श विद्यार्थी उपक्रम राबविणे, शिक्षण क्षेत्रातील विविध विचारवंताचे व्याख्यानमालेचे आयोजन करणे, वर्गातील नापास विद्यार्थ्यांची यादी काढून त्या विद्यार्थ्यांना समज देण्यासाठी त्यांच्या पालकांना बोलाविणे, ११ वी- १२वी होणाऱ्या वेगवेगळ्या चाचण्या, प्रथम सत्र परिक्षेत पहिले ३ (तीन) विद्यार्थ्यांना पारितोषीक देणे, इत्यादी उपक्रम राबवितात.

**६.**१००टक्के प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सहकाऱ्याशी चर्चा होते असा प्रतिसाद दिला.

**७.**६५टक्के प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करियर गाईडन्स, स्पोकन इंग्लिश, दर शुक्रवारी मौलवीचे नितीमुल्याविषयी व्याख्यानाचे आयोजन करणे इत्यादी करतात असा प्रतिसाद दिला तर ३५टक्के प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कोणतेच प्रयत्न करीत नाही असा प्रतिसाद दिला.

**८.**१००टक्के प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना लैंगिकतेचे शिक्षण देण्याची गरज नाही असा प्रतिसाद दिला.

**९.**८०टक्के प्राचार्यांनी आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयात लैंगिक छळ व प्रतिबंधक समितीची स्थापना केली नाही असा प्रतिसाद दिला तर २०टक्के प्राचार्यांनी आपल्या उच्च माध्यमिक विद्यालयात लैंगिक छळ व प्रतिबंधक समितीची स्थापना केलेली आहे असा प्रतिसाद दिला.

**१०.**१००टक्के प्राचार्यांनी शिक्षकाच्या अडचणी संदर्भात चर्चा करतात असा प्रतिसाद दिला.

**११.**६५टक्के प्राचार्यांनी शिक्षकांच्या अडचणी संदर्भात केलेल्या चर्चेवर अंमलबजावणी होते असा प्रतिसाद दिला तर ३५टक्के प्राचार्यांनी शिक्षकांच्या अडचणी संदर्भात केलेल्या चर्चेवर अंमलबजावणी होत नाही असा प्रतिसाद दिला.

**१२.**१००टक्के प्राचार्य पालकांशी संपर्क साधतात असा प्रतिसाद दिला.

**१३.**१००टक्के प्राचार्य पालकांशी संपर्क विद्यार्थ्यांचा गुणपत्रिका देताना, वर्गातील सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे वर्तन बेशिस्तीचे असेल, त्याचप्रमाणे मुस्लिम अल्पसंख्यांक आयोगाच्या संदर्भात एखादी योजना आली असल्यास त्या योजनेचे महत्त्व पालकांना जाणून देण्यासाठी, पालक सभेचे आयोजन केलेले असताना पालकांशी संपर्क साधतात असा प्रतिसाद दिला.

**१४.**१००टक्के प्राचार्यांनी मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परिक्षेचे फी कमी स्वरुपाची असावी, मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती ची रक्कमेत वाढ करावी, शिष्यवृत्ती देताना कमीत-कमी कागदपत्राची पुर्तता असावी. जी शिष्यवृत्ती देण्यात येते ती लवकरात-लवकर देण्यात यावी. मुस्लिमांच्या संदर्भात जे.जे. आयोग नेमले आहेत त्या आयोगांच्या शिफारशींची जास्तीत जास्त अंमलबजावणी करावी, मुस्लिम अल्पसंख्यांकाना नोकरीत ठराविक टक्के आरक्षण द्यावे, मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी विविध स्वरुपाचे छोटे लघु उद्योजक स्वरुपाचे व्यवसाय, त्याव्यवसायासाठी लागणारी आवश्यक ते आर्थिक सहाय्य कमीत-कमी व्याजदरात उपलब्ध करुन द्यावीत. स्पर्धात्मक परिक्षेसाठी जाव्या लागणाऱ्या विविध प्रकारच्या प्रवासासाठी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्यात यावेत. मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी शालेय व उच्चमाध्यमिक स्तरावर विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे असा प्रतिसाद दिला.

**१५.**१००टक्के प्राचार्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या उर्दु साहित्य फंडाचा वापर करत नाही असा प्रतिसाद दिला.

**पालक मुलाखतीवरून मिळालेले निष्कर्ष :**

**१.**घरी पाल्य नियमितपणे अभ्यास करतो असे म्हणणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (१८टक्के ) इतके आहे तर घरी पाल्य नियमितपणे अभ्यास करीत नाही असे म्हणणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण बहुताशी (७८टक्के ) इतके नाही.

**२.**पालकांच्या मार्गदर्शनांचा अभाव, निरक्षरता, सभोवतालचे वातावरण अभ्यासपूरक नसणे, (लघु) व्यवसायात अधिक लक्ष गुंतवलेले असणे, अर्थिक परिस्थिती बिकट असल्याकारणाने (अर्थिक पाठबळाचा अभाव) इत्यादीकारणामुळे पाल्य अभ्यास करीत नाही असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण बहुतांश / निम्म्याहुन अधिक (७५टक्के ) आहे

**३.** घरी पाल्याला भौतिक व शैक्षणिक सुविधामध्ये स्वतंत्र अभ्यास खोली, संगणकाची सुविधा, वेळच्या वेळी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे, खाजगी क्लासला पाठविणे, शैक्षणिक साहित्य ठेवण्यासाठी कपाटे नसणे इत्यादी आहे असे म्हणणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (३५टक्के ) इतके आहे तर वरील कोणत्याही प्रकारचे भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाही असे म्हणणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण बहुतांश/ निम्म्याहुन अधिक (६५टक्के ) इतके आहे.

४.उर्दू ही भाषा (soft) मृदू भाषा आहे. त्याचप्रमाणे उर्दू ही भाषा समजण्यास सोपी आहे. या माध्यमातून शिक्षण घेतल्याने विदयार्थ्यामागील आचार-विचारांचे योग्य शिष्ट नियम येतात. असे म्हणणारे प्रतिसादकांचे प्रमाण अधिकांश (९८टक्के ) इतके आहे.

**५.**स्त्रियांना शिक्षण दयावे असे म्हणणा-या प्रतिसादकांचे प्रमाण अत्यल्प (२७टक्के )इतके होते तर स्त्रियांना शिक्षण देऊ नये असे म्हणणा-या प्रतिसादकांचे शेकडा प्रमाण (७३टक्के ) इतके आहे.

**६.**मुलींना जास्त शिक्षण देणे इस्लामिक रुढी परंपरेत बसत नाहीत. असे म्हणणारे प्रतिसादकाचे प्रमाण अत्यल्प (२०टक्के ) आहे. तर मुलींना जास्त शिक्षण देत राहिल्यास शिक्षणाचा खर्च जास्त वाढत जातो व ते अर्थिकदृष्टया परवडणारे नाही तसेच वय वाढत गेल्याने लग्नाच्या अडचणी येतात असे म्हणणारे प्रतिसादकाचे प्रमाण बहुतांश निम्म्याहुन अधिक (६०टक्के ) आहे. तसेच सध्याच्या जर वातावरणात पाहिले तर मुलींना जर अधिकचे शिक्षण देण्यास म्हटले की त्यांना बाहेर गावी जावे लागते. अशा वेळी मुली सुरक्षित राहतील की नाही याची शाश्वती नसते असे म्हणणारे प्रतिसादकाचे प्रमाण अत्यल्प (१८टक्के ) आहे.

**७.**स्त्रियांनी नोकरी करावे असा प्रतिसाद देणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (२२टक्के ) इतके आहे तर स्त्रियांनी नोकरी करु नये असे म्हणणा-या प्रतिसादकांचे निम्म्याहुन अधिक (८२टक्के ) इतके आहे.

**८.**साधारण वयाच्या अठरा वर्ष ते वीस वर्ष दरम्यान मुलीचा विवाह व्हावा असे म्हणणा-या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण निम्म्याहुन अधिक (६७टक्के ) इतके आहे. तर मुलीचा विवाह हे २२ ते २४ वय वर्ष दरम्यान व्हावा असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (३३टक्के ) इतके आहे.

**९.**वसतिगृहात मुलींनी राहणे अयोग्य आहे असे प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण बहुतांश (८५टक्के) इतके आहे तर वसतिगृहात मुलींनी राहणे अयोग्य नाही असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (१५टक्के ) इतके आहे.

**१०.**उच्च माध्यमिक विदयालयात जाताना मुलींनी बुरखा घालावा असा प्रतिसाद देणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण बहुंतांश (९०टक्के ) इतके आहे तर उच्च माध्यमिक विदयालयात जाताना मुलींनी बुरखा घालू नये असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण खूपच कमी (१०टक्के ) इतके आहे .

**११.**मुलींनी /विदयार्थीनींनी उच्च माध्यमिक विद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेण्याची परवानगी देतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (१८टक्के ) इतके आहे तर मुलींना उच्च माध्यमिक विद्यालयीन स्पर्धांमध्ये भाग घेण्याची परवानगी देत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण बहुतांश (७८टक्के ) इतके आहे.

**१२.**उच्च माध्यमिक विदयालयाची शिस्त कडक असावी असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण अधिकांश (९८टक्के ) इतके आहे.

**१३.**मुस्लिम विदयार्थ्यांसाठी शासनाने राबविलेल्या योजना कार्यक्रम यांचा फायदा होतो असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे प्रमाण अत्यल्प (२५टक्के ) इतके आहे तर मुस्लिम विदयार्थ्यांसाठी शासनाने राबविलेल्या योजना कार्यक्रम यांचा फायदा घेत नाही असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण बहुतांश (७५टक्के ) इतके आहे.

**१४.**विदयार्थ्यांसाठी शासनाने शिष्यवृत्तीत वाढ करावी तसेच यातील वार्षिक उत्पन्नाची मर्यादा वाढवावी (४.५० लाख रुपये) असे म्हणणाऱ्या प्रतिसादकाचे शेकडा प्रमाण अत्यल्प (१४टक्के ) इतके आहे तर बहुतांश प्रतिसादकांनी (८५टक्के ) मुस्लिम विदयार्थ्यांना नोकरीत व त्याचप्रमाणे शिक्षणात आरक्षण दयावे, स्पर्धात्मक परिक्षेसाठीची फि कमी असावी, स्पर्धा परिक्षेस जाताना टी.ए. व डी.ए. देण्यात यावे असा प्रतिसाद दिला

**संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष :**

**उद्दिष्टः**

**सोलापूर जिल्हयातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.**

**निष्कर्ष :**

१ उच्च माध्यमिक स्तरावर अध्ययनासाठी मुलींना पालकांचे सहकार्य मिळत नाही.

२ ६० टक्के विदयार्थीनींना घरी अध्ययनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही.

३ ७० टक्के पालक मुलांचे शिक्षण हा विषय फार गांभीर्याने घेत नाहीत

४ मुलींच्या सुरक्षितेबद्दल पालक असमाधानी आहे.

५ उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींना सांस्कृतिक स्पर्धा, क्रिडा स्पर्धा, इतर शालाबाहय स्पर्धा , सहल यामध्ये सहभागी होण्यास जवळ जवळ ८० टक्के पालक परवानगी देत नाहीत.

६ उच्च माध्यमिक स्तरावर मुलाप्रमाणे मुलींना शिक्षण देण्याची प्रेरणा पालकाकडून मिळत नाही.

७ ८५ टक्के पालक मुलींना उच्च माध्यमिक विद्यालयात जाताना बुरखा घालण्याची सक्ती करतात.

८ ९० टक्के विद्यार्थी वक्फ बोर्डातून मदत घेत नाहीत.

९ ८७ टक्के समाजातील व्यक्ती शिक्षणाबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत नाहीत.

**उद्दिष्ट:**

**सोलापूर जिल्हयातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्याच्या कौटूंबिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.**

**निष्कर्ष** :

१. ८० टकके एवढया मुस्लिम कुटुंबाची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही

२. ६० टक्के कुटुंबाचा आर्थिक स्त्रोत रोजंदारी हा नाही .

३. ७५ टक्के विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना आर्थिक अडचण जाणवते .

४. कोणत्याही उच्च माध्यमिक विदयालयात कमवा व शिका योजना नाही .

५. पारंपारिक व्यवसायामुळे बहुतांश विदयार्थ्यांना पालकांच्या कामात , व्यवसायात मदत करावी लागते

६. ७० टक्के पालकांच्या घरी जुन्या रुढी , परंपरा , अंधश्रध्दा पाळताना दिसून येते

७ . उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींना शिक्षण दिल्यास विविध समस्यांना तोंड दयावे अशी साधार भिती पालकांना वाटते उदा. लग्न जमण्यास अडचण , स्वतंत्र विचारसरणी इत्यादी

८. ७० टक्के पालकांच्या घरी अभ्यासासाठी व्यक्तिगत योग्य मार्गदर्शन मिळत नाही.

१. ७३ टक्के पालकांच्या कुटुंबातील वातावरण शिक्षणास पोषक नाही.
९.७३ टक्के पालकांच्या घरातून शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत नाही.

**उद्दिष्ट:**

**सोलापूर जिल्हयातील उच्च माध्यमिक स्तरावरील मुस्लिम अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.**

१ . ५० टक्के उच्च माध्यमिक विदयालयात ग्रंथालयात पुरेसे संदर्भ ग्रंथ नाही.

२. ६० टक्के शिक्षक अध्यापनात दृकश्राव्य साधनांचा अध्यापनात वापर करतात.

३. एकही उच्च माध्यमिक विदयालयात भाषा प्रयोगशाळा नाही.

४. ९५ टक्के उच्च माध्यमिक विदयालयात वस्तीगृहाची सुविधा नाही.

५. ६० टक्के उच्च माध्यमिक विदयालयात क्रिडांगण नाही.

६ . ८० टक्के उच्च माध्यमिक विदयालयात संगणक सुविधा असली तरी त्याचा वापर विदयार्थ्यांना करु दिला जात नाही.

७. ८५ टक्के उच्च माध्यमिक विदयालयात स्वयं अध्ययन करण्यास शिक्षक प्रोत्साहित करीत नाहीत.

८. ६० टक्के उच्च माध्यमिक विदयालयात सहशालेय उपक्रमाचे आयोजन केले जात नाही.

९. १०० टक्के उच्च माध्यमिक विदयालयात सहलीचे आयोजन केले जात नाही.

१०. ६५ टक्के उच्च माध्यमिक विदयालयात शिक्षक अध्यापनासाठी नविन तंत्रे पध्दती यांचा वापर करीत नाही.

११. एकही उच्च माध्यमिक विदयालयाने विदयार्थ्यांना येण्याजाण्यासाठी(दळणवळणासाठी) विदयालयीन बसची व्यवस्था केली नाही.

१२. ४० टक्के उच्च माध्यमिक विदयालयामध्ये विदयार्थी व विदयार्थीनीसाठी स्वतंत्र व सुसज्ज स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही.

१३. ५०टक्के उच्च माध्यमिक विदयालयामध्ये स्वतंत्र वाचनालय , अभ्यासिका व पुरेसे फर्निचर उपलब्ध आहे.

१४. ७० टक्के पालकांच्या घरी पाल्याच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण नाही .

१५. ७५ टक्के पालकांच्या विशेष करुन ग्रामीण भागामध्ये अधिक प्रमाणात पाल्यांच्या घरी अभ्यासासाठी टेबल , खुर्ची , टेबल लॅम्प , स्वतंत्र खोली, इत्यादी सुविधा उपलब्ध नाहीत.

१६. ७० टक्के विद्यार्थी अध्ययनास उपयुक्त असे दुरदर्शनवरील शैक्षणिक कार्यक्रम कधीच पाहत नाहीत

**३. शिफारशी :**

संशोधनाच्या प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण व पडताळासूची या साधन व तंत्रामुळे प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेषण करून संशोधनाच्या उद्दिष्टानुसार पुढील प्रमाणे शिफारशी करण्यात आल्या आहेत.

**अ) सामाजिक समस्या**

१.रोटरी क्लब, लायन्स क्लब यासारख्या स्वयंसेवी संस्थांनी या आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य दयावे.

२.समाजातील विचारवंत, राजकीय नेते इत्यादींनी मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाकरीता मदतीचा हात देणे आवश्यक आहे.

३.मुस्लिम अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी वक्फ बोर्ड या सामाजिक संस्थेची माहिती करुन घेऊन त्या संस्थेमार्फत मिळणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम यांची ओळख करुन घ्यावी.

४. मुलींना शिक्षण दिल्यास त्या विविध क्षेत्रात चमकू शकतात. हे पालकांना पटवून दयावे. त्यांच्यासाठी असणारी मुला-मुलींमधील भेदांची दरी दूर करण्याचा प्रयत्न व्हावा.

**ब) कौटुंबिक समस्या व आर्थिक समस्या**

१.संस्थाचालकांनी कमवा व शिका ही योजना उच्च माध्यमिक विदयालयीन स्तरावर सुरु करावी.

२.स्वयंसेवी संस्था व शासनाचा उदयोग विभाग याच्या मार्फत मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना आर्थिक उन्नतीचे मार्ग दाखविण्यासाठी प्रबोधनपर शिबीरे घेण्यात यावीत.

३.पालकांनी पाल्याला घरातून अभ्यास करण्यास प्रोत्साहन दयावे.

४.पालकांनी आपल्या मुलींना बुरखा घालण्याची सक्ती करु नये.

५.पालकांनी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीची विचारण महिन्यातून एकदा तर करावी ही रास्त अपेक्षा.

६.पालकांनी उच्च माध्यमिक विदयालयातील आयोजित केलेल्या पालक मेळाव्यास आर्वजून उपस्थित राहावे व त्यात आपला पाल्याच्या संदर्भातील येणाऱ्या समस्या सांगाव्यात.

७.मुस्लिम अल्पसंख्यांकाच्या प्रगतीसाठी, शासनस्तरावर (केंद्रशासन, राज्य स्तरावर) जे काही नव-नवीन परिपत्रके,योजना आहेत त्या कोणत्या स्वरुपाच्या आहेत. याचा मुस्लिम अल्पसंख्यांक पालकांनी शोध घ्यावा व त्याचा पाठपुरावा करुन त्या योजनेचा फायदा करुन घ्यावा.

८.मुस्लिम समाजात 'इज्जत की रोटी' ला महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्या दृष्टिकोनातून आपला पाल्याला आपलाच व्यवसाय पुढे चालवावा म्हणून त्याची हाकाटी लावू नये किंवा त्यांच्यावर कोणताही प्रकारे दबाव आणू नये.पाल्याची उच्च माध्यमिक विदयालयीन स्तरावर शैक्षणिक संपादणूक चांगल्या प्रकारची असेल तर त्याला पुढे जास्तीत जास्त Scope (वाव) कसा मिळेल याचा ध्यास पालकांने करावा व त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करावेत.

९.पालकांनी आपल्या मुलीचे वाढते वय विचारात घेवून लवकर लग्न लावू नये. मुलीच्या करीयरचा ही विचार पालकांनी करावा.

१०. पालकांनी पाल्याला स्पर्धात्मक परिक्षेस बसण्यासाठीची मानसिक पूर्वतयारी करुन घ्यावी के जेणेकरुन पाल्य मोठया आत्मविश्वासाने स्पर्धात्मक परिक्षेस (U.P.S.C., M.P.S.C.) बसतील.

११.पालकांनी आपल्या पाल्याला सर्वांगीण विकासाठी घरातील सोयी - सुविधा अधिका-अधिक कशा प्रकार वाढवता येतील याचा ध्यास घ्यावा.(उदा.संगणक, लॅपटॉप)

१२. पालकांनी आपल्या पाल्यांच्या संदर्भात रोज संध्याकाळी व्यक्तिगत जीवन सोडून शैक्षणिक, सामाजिक बाबतीत मनमोकळेपणाने चर्चा करावी.

१३.जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अपयश येत असते. अपयश न घाबरता यशाच्या शिखराने मोठया आत्मविश्वासाने पादक्रमण करावे.असा आशावाद पालकांनी आपल्या पाल्यात निर्माण करावा. या युगात नेहमी सकारात्मक दृष्टीकोन आपल्या पाल्यात सतत निर्माण करावा.

क) **शैक्षणिक समस्या**

१.ग्रंथालयात सर्व विषयासाठीचे अध्ययन अध्यापनासाठी आवश्यक असणारे संदर्भ साहित्य उपलब्ध करावे.

२.विदयार्थ्यांच्या शारिरीक, भावनिक, मानसिक, विकासात सहशालेय उपक्रमाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्या दृष्टीकोनातून उच्च माध्यमिक विदयालयांनी सहशालेय उपक्रमाचे आयोजन करावे. त्यात विदयार्थ्यांना जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन दयावी.

३.सर्वच उच्च माध्यमिक विदयालयांनी स्नेह संमेलन (गॅदरींग) घ्यावीत की जेणेकरुन विदयार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

४.ज्या उच्च माध्यमिक विदयालयात क्रिडेचे साहित्य नाही. त्या विदयांनी संस्थेकडून क्रिडेची साहीत्याची खरेदी करावी.

५.सहलीमुळे तेथे घडलेल्या महत्त्वाच्या भौगोलिक घटना, दृश्ये,संकल्पना अधिक प्रभावीपणे उपलब्ध वेळेत निरीक्षणातून सांगता येतात. अध्यापनात सहलीचे महत्त्व लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या लहाण-मोठया सहलीचे आयोजन विदयालयांनी करावे.

६.प्रत्येक उच्च माध्यमिक विदयालयात अभ्यासिका आवश्यक करावी त्या अभ्यासिकेची वेळ विदयार्थ्यांना सोयीनुसार असावी. दररोज एका शिक्षकांचे मार्गदर्शन तेथे व्हावे.

**इतर शिफारशी :-**

१.मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांकडे शासनाने केवळ बघ्याची भूमिका न पाहता अमंलबजावणी करावी.

२.शासनाने मुस्लिम अल्पसंख्यांक समाजासाठी जरी वेगवेगळया समित्या नेमल्या असल्या तरी (त्या समित्यांना) केवळ लेबलिंग न लावता (उदा.सच्चर आयोग,डॉ.रंगनाथ मिश्रा आयोग,डॉ.पंतप्रधान मनमोहसिंग यांची १४ कलमी योजना ) या आयोगाने केलेल्या सुचना तत्वे,प्रत्यक्षात राबवाव्यात केवळ कागदी घोडे नाचवायचे असा प्रकार करता कामा नये.

३.शासनाने मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांसाठी ज्या वेगवेगळे योजना राबविला आहेत.

( उदा.मुस्लिम अल्पसंख्यांतील विदयार्थ्यांना मैट्रीक पूर्व मैट्रीक उत्तर शिष्यवृत्ती ) शिष्यवृत्ती दिली जाती.ती शिष्यवृत्ती रक्कम अतिशय कमी आहे. ही शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करावी शिवाय ही शिष्यवृत्ती दिली जाताना जे निकष लावले आहेत ते निकषातील उत्पन्नाच्या अटी कमी करावी की जेणेकरुन याचा फायदा मुस्लिम अल्पसंख्यांक समाजातील बहुसंख्य विदयार्थ्यांना होईल.

४.शासनाने मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायातील कनिष्ठ महाविदयालयांना मान्यता देताना त्यांना वसतिगृह बांधण्याची सक्ती करावी.

५.शासनाने प्रत्येक जिल्हयात ज्या प्रमाणे अनुसुचित जाती साठी वसतिगृहाची सोय केलेली आहे.अगदी त्याचप्रमाणे मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करावी जेणेकरुन बाहेरगावी येणाऱ्या विदयार्थ्यांच्या निवासाठी सोय होईल.

६.शासनाने उर्दू भाषेच्या विकासाच्या संदर्भात प्रयत्न करावे.प्रत्येक जिल्हयात उर्दू अध्यासन केंद्र काढावे.

७.शासनाने मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायातील आर्थिक दृष्टया दुर्बल विदयार्थ्यांना मोफत गणवेश उपलब्ध करुन दयावा.

८. प्रत्येक वर्षाचा अनुभव पाहता स्पर्धात्मक (U.P.S.C., M.P.S.C.) परीक्षेत मुस्लिम अल्पसंख्यांक समुदयातील विदयार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण फारच नगण्य स्वरुपाचे आहे. या दृष्टीकोनातून मुस्लिम अल्पसंख्यांक समुदयातील विदयार्थ्यान याबाबतीत जागृती निर्माण होण्यासाठी व त्याचबरोबर त्याच्यात या परीक्षाबद्दलची असणारी भिती कमी करण्यासाठी शासनाने प्रत्येक जिल्हयात स्पर्धात्मक परीक्षा केंद्राची निर्मिती करावी व यातील प्रवेश घेणाऱ्या विदयार्थ्यांना ठराविक मानधन (Stypend) देण्याची सोय करावी.

९. मुस्लिम अल्पसंख्यांक समुदायातील विदयार्थ्यांचे बहुतांशी पालक हे व्यवसाय करतात. यातील बहुतांशी पालक हे निरक्षर आहेत. ते व्यवसायाठी कर्ज काढत आहेत आणि या कर्जापोटी त्या ठराविक व्याज दयावे लागते. मौलाना आझाद महामंडळ हे एक कर्जाच्या रुपात व्यवसायकांना आर्थिक मदत करते. ही कर्ज घेताना त्याच्या अटी व नियम जास्त आहेत व वार्षिक व्याज दर जास्त आहे. त्यामुळे आर्थिक दृष्टया दुर्बल असलेला मुस्लिम अल्पसंख्यांक व्यवसायिकांना कर्ज घेण्यास मर्यादा येतात. या गोष्टी लक्षात घेऊन शासनाने या अटी व नियम शिथिल करुन व त्याचप्रमाणे वार्षिक व्याजदर कमी करावे की जेणेकरुन मुस्लिम अल्पसंख्यांक समुदयातील लोकांना त्याचा फायदा होईल व ते राहणीमानाचा दर्जा चांगल्या प्रकारे वाढवू शकतील.

१०. शासनाची प्रत्येक जिल्हयात मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांसाठी उच्च शिक्षण व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र काढावे जेणेकरुन मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना त्याचे वैयक्तिक करीअर चांगल्या प्रकारे करता येतील.

११.शासनाने मुस्लिम अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेचे फार्म भरण्यासाठीचे फी नाममात्र करावी.

१२.मुस्लिम अल्पसंख्यांक समुदयातील विदयार्थ्यांना नोकरीत आरक्षण दयावे.

(डॉ. रंगनाथ मिश्रा आयोग प्रमाणे १५ % नोकरीत आरक्षण असावे.)

१३.ज्या जिल्हयामध्ये, शहरामध्ये अल्पसंख्यांकाचे प्रमाण अधिक आहे. त्या जिल्हयात विशेष करुन मुलींसाठी हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या पाहीजेत. या केंद्रातून प्रामुख्याने स्त्रीशिक्षिका राज्य सरकारने नियुक्त करावे.

१४. अल्पसंख्यांकाची दाट लोकवस्ती असलेल्या जिल्हयांकडे, शहरांकडे विशेष लक्ष पुरवून अल्पसंख्यांक समाजातील मुलांना प्रवेश देण्याच्या बाबतीत लक्ष दिले पाहिजे पालकांना मोबदला दयावा, जेणेकरुन ते आपल्या पाल्यांना स्वखुशीने पाठवतील

१५. शैक्षणिक दृष्टया मागासलेपणा अल्पसंख्यांकाची गरज पुरवण्यासाठी त्यांच्या उच्च माध्यमिक शाळांमधून विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

१६. भाषिक अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक सोयीबाबतची माहिती संकलित करण्याचे कामे राज्य सरकारने व सामाजिक संस्थांनी त्वरीत हाती घेतली पाहिजे.

१७. संविधानातील शैक्षणिक अधिकाराबाबत अल्पसंख्यांकांना शासनाने व सामाजिक कार्यकर्त्यांनी जाणीव करुन दयावी व जास्तीत जास्त शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी त्यांना प्रेरित केले पाहीजे.

१८. मदरसांना आधुनिक शिक्षणाचे केंद्र बनवावे.

१९.प्राथमिक शाळांप्रमाणे उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींच्या उपस्थिती साठी मुलींना मासिक उपस्थिती भत्ता देण्याची सोय शासनाने करावी.

२०.शिक्षण घेतल्यास मुलींचे लग्न जमण्यास अडचण येते,मुलींना स्वातंत्र्य प्राप्त होते. असे पालकांमध्ये असणारे गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**४. पुढील संशोधनासाठी विषय** :-

१. महाराष्ट्रातील उर्दु उच्च माध्यमिक विदयालयामधील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण अभ्यासणे.

२.सोलापूर जिल्हयातील उर्दु माध्यमिक मुस्लिम विदयार्थ्यांच्या समस्या व इतर माध्यमातील मुस्लिम विदयार्थ्यांच्या समस्या यांचा तुलनात्मक अभ्यास.

३.सोलापूर जिल्हयातील उच्च माध्यमिक उर्दु माध्यमांच्या विदयालयाचा सदय: स्थितीचा चिकित्सक अभ्यास.

४.मुस्लिम अल्पसंख्यांक समाजासाठी शासनामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

५.महाराष्ट्रातील उर्दू माध्यमिक विदयालयामधील मुलींच्या गळतीचे प्रमाण अभ्यासणे.

## BIBLIOGRAPHY

1. Best; J.W. (1995) "Research in Education" Ninth edition, Delhi, Ghosh Prakashan.

2. Buch; M.B. (1978-83) : Second Survey of Research in Education, New Delhi, NCERT.

3. Buch; M.B. (1978-83) : Third Survey of Research in Education, New Delhi, NCERT.

4. Buch; M.B. (1978-83) : Fourth Survey of Research in Education, New Delhi, NCERT

5. Raina, M. K .(2008) : Educational Research, New Delhi, Max Ford.

6. Thakur, R.N., (1999), Plight of the Minority Problems and Grievances in their education, New Delhi, Gyan Publishing House.

7. Verma, R.K.,Verma, G. (1989) Research Methodology, Pune, Nitya Prakashan.

Magazines and Periodicals

8. Gregory L.B. (1989) : 'Education for Minorities' Mumbai. Page No. -210.

9. Swarup S. (Augus 2001): Research in special education University news (New Delhi: Association of Indian Universities, New Delhi) Vol. 39 Page No.28

10. Khan D.M. (1989) 'Education for Equality Minority Education' (Muslim Community) Page No.100.

WEBLIOGRAPHY

1. (http://www.thesouthasian.org/archives/2005/problems_faced_by_ muslim_women.html)

2. Saccher Commission Report (http://www.saccher commission.org/in)

3. Dr.Rangnath Mishra Commission Report

(http://www.drrangnth mishra commission.org/in)

**संदर्भग्रंथ - सूची**


| | | |
|---|---|---|
| १ | कायंदे पाटील, ग.वि. (२००९) | संशोधन पद्धती,नाशिकः पाचवी आवृत्ती, चैतन्य पब्लिकेशन. |
| २ | कुलकर्णी, वि. (२००६) | भारतीय आधुनिक शिक्षण, समस्या आणि उपाय, पुणेः श्रीविद्या प्रकाशन. |
| ३ | गटकळ, रं. सं. (२००३) | माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास, नाशिकः गटकळ प्रकाशन. |
| ४ | देशपांडे, लि. (२००४) | सर्वेक्षण - एक संशोधनपद्धती, नाशिकः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. |
| ५ | पाटील, ली., कुलकर्णी वि.म. (१९७१) | आजचे शिक्षण आजच्या समस्या, पुणेः विद्याप्रकाशन. |
| ६ | पाठक, प.ड. | भारतीय शिक्षा और उसकी समस्याएँ, आगाराः विनोद पुस्तक. |
| ७ | पारसनीस, हे (२००९) | शैक्षणिक संशोधन नमूना निवड, पुणेः नित्य नूतन प्रकाशन. |
| ८ | पोखरापूरकर, द.ख. (२००८) | पथदर्शक अभ्यासाचे संशोधनात उपयोजन, पुष्प सहावे, सातवी आवृत्ती, नाशिकः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ. |
| ९ | बापट, भा.गो. (१९७५ | शैक्षणिक संशोधन, तृतीय आवृत्ती, पुणेः नूतन प्रकाशन. |
| १० | भोसले, क. (१९९४) | माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण समस्या, पुणेः नूतन प्रकाशन. |
| ११ | भिंताडे, वि.रा. (२००६ | शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणेः नित्यनूतन प्रकाशन. |
| १२ | भिंताडे, वि.रा. (२००९) | शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणेः नित्यनूतन प्रकाशन. |
| १३ | मस्के, तु. ए. (१९९१) | शैक्षणिक संख्याशास्त्र, द्वितीय आवृत्ती, संगमनेरः प्रज्ञा प्रकाशन. |
| १४ | मुळे, रा. श., उमाटे, वि.तु. (१९९८ | शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, औरंगाबादः विद्या बुकस. |
| १५ | मोरे, शे. (मार्च २००३) | मुस्लिम मनाचा शोध, नांदेडः बापुराव प्रकाशन. |
| १६ | वास्कर. आ., वास्कर, पु. (१९९८) | भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, पुणेः नूतन प्रकाशन. |
| १७ | नगरकर .व्ही. (१९९०) | 'भारतीय मुसलमान',अकोलाःआनंद प्रकाशन |
| १८ | नागोराव. के. (२०००) | 'मुस्लिम साहित्य व समाज चिंतन'.पुणेः धनजय प्रकाशन |
| १९ | हुसैन डी. (१९६८) | भारतीय मुस्लिम , 'आव्हान आणि आवाहन', मुंबई : ताज प्रकाशन |
| २० | चाऊस ए.ए. (१९८९) | 'अल्पसंख्यांकाचे शिक्षण', नगरः संकेत प्रकाशन |
| २१ | म्हैसकर गो.रा.(१९८९ | 'समतेसाठी शिक्षण', औरंगाबादः सचिन प्रकाशन |
| २२ | नाकतोडे के (१९९७) | 'अल्पसंख्यांकांची दृष्टी', पुणेः जिव्हाळा प्रकाशन |

| | | |
|---|---|---|
| २३ | लाटकर एस, भगत रा.तु.,डांगे सी (सप्टें.१९८४) | 'उच्च शिक्षण अभ्यासक्रम आणि समस्या, पुणेः अनिरुध्द प्रकाशन |
| २४ | करंदीकर एस व कुलकर्णी वि.मा.,पालसाने एम.एन. (डिसें.-१९८१) | 'महाराष्ट्रातील महाविदयालयीन विदयार्थ्यांचे प्रश्न', मुंबई : मॅजिस्ट्रीक प्रकाशन |
| २५ | अन्सारी एम.ए. (१९८७) | समानता के लिए शिक्षा, अल्पसंख्योको के लिए शिक्षा, उत्तर प्रदेशःचाँद प्रकाशन |
| २६ | जौहरी एवं पाठक :- (१९९६) | 'भारतीय शिक्षण का इतिहास', उत्तर प्रदेश : चाँद प्रकाशन |

**लेख - वर्तमानपत्रे - नियतकालिके**

१) पटवर्धन ए.एम. (फेब्रु.-१९६८) 'साधना' साप्ताहिक . पृष्ठ क्रं. - २२.

२) भालेराव ए.ए. (आक्टो २००८)'किस्त्रीम' दिवाळी अंक 'साचर समिती शिफारशी कागदावरच' पृष्ठ क्रं. १३८.

३) कामत अ.रा.(जाने.-१९९०)'समाज प्रबोधन पत्रिका','मुस्लिमांमधील साक्षरता अभियान '. पृष्ठे -३३७.

४) शेख बी.अ.(फेब्रु.-१९९६) 'मुस्लिम समाज दिशा व दशा'. पृष्ठे -८०.

७) लोकसत्ता (२४ जूलै २००६) 'अल्पसंख्यांकांना मुस्लिम म्हणून देशात राहणे अवघड ' तिस्ता सेटलवाड. पुणे प्रतिनिधी.

८) लोकसत्ता (सप्टें.-२००६) ,'मुस्लिमांना नोकऱ्या. गुजरात आघाडीवर पश्चिम बंगालमध्ये डावे अस्वस्थ' !, मुंबई प्रतिनिधी.

९) महाराष्ट्र टाईम्स (२५जुलै,२००६) 'नेतृत्त्वहीन समाजाची फरफट उत्तरप्रदेश व बिहारमधील मुस्लिम संशयांच्या भोवऱ्यात सापडले', मुंबई प्रतिनिधी.

१०) महाराष्ट्र टाईम्स (२४ जुलै, २००८) 'मदरसे दहशतवादाचे नव्हे समाजसेवेचे केंद्र' मुंबई प्रतिनिधी.